I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 165-170
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड-19 चे जागतीक आर्थिक व सामाजीक परिणाम

निशिकांत चंद्रलाल बुल्ले
गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोली.
*Corresponding Author: nishikant.bulle@gmail.com

**सारांश:-**

कोविड-19 या विषाणूच्या प्रसारामुळे आतापर्यत जगभरात साधारणतः 8,602,039 लोकांना लागण झाल्याचे निदान झाले. याशिवाय 456,802 पेक्षा जास्त लोकांचा यामुळे बळी गेला आहे. या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपुर्ण जगात आर्थिक मंदीची परिस्थिती निर्माण झाली आहे. कोविड-19 चा प्रसार रोखण्याचा एक भाग म्हणून जगातील अनेक देशांनी आपल्या देशात टाळेबंदी ची घोषणा केली. यामुळे विविध देशात होणारी प्रवासी वाहतूक व आयात-निर्यात बंद झाली. जगातील अनेक देशात टाळेबंदीची परिस्थिती असल्यामूळे संपूर्ण उत्पादन प्रणालीच बंद होती त्यामुळे ब-याच लोकांनी या काळात आपला रोजगार गमावला आहे. कोविड-19 चा प्रसार रोखण्यासाठी शाळा व महाविद्यायलेही बंद झाली आहेत यामुळे जगभरात शिक्षण घेत असलेल्या असंख्य विद्यार्थाचे यामुळे नुकसान झाले आहे. कोविड-19 च्या प्रभावामुळे जगभरातील आरोग्य सेवेवरिल अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. याशिवाय कोविड-19 काही सामाजीक घटकावर सुध्दा परिणाम झाला आहे या सर्व परिणामांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

**बिज संज्ञा:-** कोविड-19, कोरोना, आर्थिक परिणाम, सामाजीक परिणाम

**प्रस्तावना:-**

सध्या संपूर्ण जगाला एका अभूतपूर्व संकटाचा सामना करावा लागत आहे तो म्हणजे कोरोना विषाणू होय. यालाच कोविड-19 सुध्दा म्हटले जाते. एकीकडे जागतीक अर्थव्यवस्थेची घसरण होत असतांना त्यात आणखी कोरोना विषाणूची धास्ती यामुळे जगातील अनेक देश या संकटामूळे हतबल झाले आहेत. जगातील बलाढय समजल्या जाणा-या अर्थव्यवस्था देखिल कोविड-19 च्या प्रभावापासून दुर राहू नाही शकल्या. प्रत्येक देश देशाच्या विकासाची धोरणे आखत असतांना कोरोना विषाणुने या विकासाच्या धोरणावरच प्रतिघात केला आहे. त्यामुळे प्रत्येक देश आता काही काळ विकासावरून लक्ष हटवुन या विषाणूचा सामना करण्यावर भर देत आहे.

कोविड-19 चा पहिला रूग्ण हा चिनच्या वुहान शहरात डिसेंबर 2019 निघाला कि, जे वुहान शहर चिनचे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून ओळखले जाते. यानंतर कोरोनाचा प्रसार युरोप व अमेरीकतून संपुर्ण जगभर झाला. आतच्या घडीला जगातील साधारणतः 213 देशात व प्रांतातील 8,602,039 लोकांना कोरोणाची लागण झाली आहे तर कोरोणामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या ही 456,802 एवढी असून त्यात सतत वाढ होत आहे.

कोविड-19 चा प्रसार थांबविण्यासाठी जगातील अनेक देशांनी आपल्या देशात टाळेबंदी लागू केली अर्थव्यवस्थेची अनेक अंगे ही ऐकाऐकी बंद झाली याशिवाय देशादेशातून होणारी प्रवासी वाहतूक व आयात-निर्यात यावरही बंधने घातली. यामुळे सपुर्ण जगातील उत्पादन व उत्पादन साखळी प्रभावित झाली. जागतिक अर्थव्यवस्था अचानक स्थब्द झाल्याने त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील अनेक आर्थिक व सामाजीक घटकांवर झाला आहे.

**संशोधनाचा उद्देश:-**

1) कोविड-19 चा जागतीक अर्थव्यवस्थेवरिल होणारा परिणाम अभ्यासने

2) कोविड-19 चा जागतीक अर्थव्यवस्थेवरिल होणारा आर्थिक परिणाम अभ्यासने

3) कोविड-19 चा होणारा जागतीक सामाजीक परिणाम अभ्यासने

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत संशोधन हे प्रामूख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विविध संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रातील संपादकिय लेख व इंटरनेटव्दारे मिळविलेल्या माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**कोविड-19 चा जागतीक अर्थव्यवस्थेवरिल परिणाम:-**

कोविड-19 पासून होणारा संभाव्य संसर्ग रोखण्यासाठी जगातिल अनेक देशांनी आपल्या देशात टाळेबंदी केली त्यामुळे संपुण जागतिक अर्थव्यवस्था यामुळे प्रभावीत झाली आहे. आधिच जागतिक अर्थव्यवस्थेत मंदीची परिस्थिती होती आणि कोरोना विषाणुमुळे या परिस्थितीत आणखी वाढ केलेली आहे. जागतिक बॅंक व

आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या अहवालानुसार 2020 या वर्षी जागतीक अर्थव्यवस्था वाढीचा वेग खालील प्रमाने राहील.

**कोविड-19 चे जागतीक आर्थिक परिणाम:-**

**कृषी क्षेत्र:-**

कोविड-19 मूळे जागतीक अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. जगातील अनेक देशात टाळेबंदीची परिस्थिती असल्यामुळे हॉटेल व रेस्टॉरेंटच्या कृषी उत्पादनाच्या मागणीत साधारणतः 20 टक्क्यांनी घट झाली आहे. कोविड-19 चा प्रसार रोखण्यासाठी अनेक देश संरचनात्मक उपाययोजना करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे सामाजीक अंतर पाळणे व कार्यालयातील किंवा कंपण्यातील कर्मचा-यांची संख्या मर्यादीत करणे यामुळे कृषी व्यवसायासी संबधीत असणा-या कंपण्यांना याचा मोठा फटका बसला आहे.

अनेक देशात वाहतुक व्यवस्था बंद असल्याने कृषी मालाची आयात-निर्यात करणा-या कंपण्यांना याचा मोठा फटका बसला आहे. मास, भाजीपाला यासारखा नाशवंत माल बाजारपेठेपर्यत पोहचविण्यास टाळेबंदीच्या काळात अडचणी आल्या. त्यामुळे बरेचसे कृषी उत्पादन हे वाया गेले आहेत. टाळेबंदीच्या काळात वाहतुक व्यवस्था बंद असल्याने भारतासारख्या विकसनशिल देशात खते, बियाणे शेतक-याला उशिरा उपलब्द झाल्यास खरिपाच्या हंगामावर त्याचा परिणाम होण्याची संभाव्यता आहे. अनेक प्रकारच्या अफवांमुळे पोल्ट्री व्यवसायाला कोविड-19 मुळे फटका बसला आहे.

**उत्पादन क्षेत्र:-**

जागतीक उत्पादन क्षेत्रावर कोविड-19 चा मोठा परिणाम झाला आहे. या काळात सर्व उत्पादन प्रक्रिया बंद असल्याने या क्षेत्रात काम करणा-या कामगारांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम झाला आहे. यु.के. तील ब्रिटिश प्लॅस्टिक फेडरेशनने कोविड-19 चा त्यांच्या उत्पादनावर काय परिणाम झाला याचा अभ्यास केला त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, पुढील दोन तिमाहीत त्यांच्या उत्पादनात लक्षणिय घट झालेली असेल याशिवाय 98 टक्के व्यावसायिकांच्या कामांवर कोविड-19 चा नकारात्मक परिणाम होईल. कोविड-19 मुळे उत्पादन व पुरवठा साखळीत व्यत्यय आल्याने त्याचा फार मोठा परिणाम उत्पादन क्षेत्रावर झाला आहे. घरून काम करणे हा उत्पादन करणा-या कंपण्यांना पर्याय असू शकत नाही. अनेक विकसंनशिल देशांत उत्पादन क्षेत्रात काम करणा-या अकुशल कामगारांवर फार मोठा परिणाम झाला आहे. कारखाने बंद असल्याने त्यांच्या रोजगारिवर गदा आली आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी होऊन त्यांना या काळात अनेक अडचनींना तोंड दयावे लागत आहे.

जगातील अनेक रसायन कंपण्यांनी अंदाज व्यक्त केला आहे कि, त्यांचे जागतीक उत्पादनात या काळात 1.2 टक्क्यांनी घट होणार आहे. 2008 च्या जागतिक महामंदीनंतरची ही सर्वात मोठी घट आहे.

**शिक्षण:-**

कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे पुर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणांपर्यत संपुर्ण जागतीक शिक्षण व्यवस्थाच प्रभावित झाली आहे. कोविड-19 या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी जगातील अनेक देशातील शाळा, महाविद्यालये ही बंद आहेत यामुळे यात जगभरात शिक्षण घेत असलेल्या 90 कोटी पेक्षा अधिक विद्यार्थांना याचा मोठा फटका बसला आहे. अनेक देशात माठे कुटुंब असनारे व कमी उत्पन्न असणारे लोक आपल्या मुलांना वस्तीगृहात ठेऊन देतात शिक्षण त्यांच्या खाण्याचा खर्च शाळा करत असते पण आता टाळेबंदीची परिस्थिती असल्याने त्यांना आपल्या मुलांना घरी आणावे लागले आहे त्यामुळे अशा पालक वर्गाचा खर्चात वाढ झाली आहे. कोविड-19 मुळे करण्यात आलेल्या टाळेबंदीचा विद्याश्र्याच्या पालकांच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा निधी उभारण्यास अडचणी येत आहेत त्यामुळे दुबईतील साधारणतः 13,900 पालकांनी शाळेची फि ही 30 टक्क्यांपर्यत कमी करण्याच्या अर्जावर स्वाक्ष-या केल्या आहेत. कोविड-19 चा परिणाम पदवी शिक्षणावर देखिल मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येत आहे. टाळेबंदीच्या काळात अनेक देशातील महाविद्यायले व विद्यापीठे हे बंद आहेत त्यामुळे विद्याश्र्याच्या परिक्षा व मूल्यमापणाचे काम कसे करायचे याचा मोठा प्रश्न पडला आहे.

यासोबतच उच्च शिक्षणातील संशोधन कार्यात देखिल कोविड-19 मुळे मोठा फटका बसला आहे. ब-याचश्या देशात संशोधन कार्यासाठी देण्यात येणारा निधी हा थांबविला गेला आहे. यु. के. मध्ये आरोग्य संशोधनासाठी दिला जाणारा निधी तेथील सरकारणे कोविड-19 मुळे थांबविला आहे. अमेरिकेत शिक्षणासाठी प्रसिध्द असणारे हॉवर्ड विद्यापीठाने आपल्या मानवविज्ञान व सामाजिक विज्ञान विद्याशाखेतील अनेक प्रयोगशाळा ह्या या काळात बंद केल्या आहेत. अनेक देशात परिक्षा रद्द किंवा पुढे ढकलल्या जात आहेत. कोविड-19 मुळे बरेचसे परिसंवाद, कार्यशाळा हे ऑनलाईन घेण्यात येत असले तरी आभासी संवाद वैज्ञानिक संप्रेषणाच्या दृष्टीने उपयुक्त नसते.

**आरोग्य सेवा:-**

कोरोनाचे संकट हे जगातील सर्व देशांतील आरोग्य सेवेसाठी एक अभूतपूर्व आव्हान ठरले आहे. कोविड-19 संसर्गातील व्यक्तींची काळजी घेणा-या आरोग्य सेवकांना संसर्गाचा धोका होण्याचा संभव आहे. जगातील ब-याचश्या विकसनशिल देशांकडे कोरोनाच्या संसर्गापासून संरक्षण करणारे उपकरण म्हणजेच उच्च दर्जाचे एन. 95 मुखवटे, संरक्षक पोषाख (पीपीई किट) बेड, व्हेंटीलेटर यासारख्या सुविधांची कमतरता जाणवत आहे.

दिवसेंदिवस कोविड-19 च्या रग्णसंख्येत वाढ होत आहे त्यामुळे जगातील विकसित, विकसनशिल व अविकसित देशांतील आरोग्य सेवेवरिल ताण हा वाढत जात आहे.

**वित्तीय बाजार:-**

कोविड-19 चा प्रसार रोखण्यासाठी अनेक देशांनी टाळेबंदीचा मार्गचा अवलंब केला यामुळे संपुर्ण उत्पादन व उत्पादन साखळी प्रभावित झाली. याचा अप्रत्यक्ष परिणाम हा जागतिक वित्तीय बाजारावरदेखिल झाल्याचे दिसून येते. एस. अँड. पी. ही संस्था अमेरिकेतील शेअर मार्केटमधील 500 मोठया कंपण्याचे शेअर चे मोजमाप करण्याचे काम करते या संस्थेच्या अहवालानुसार अमेरिकन सरकारने कोरोना वायरस अँड रिलीफ अँन्ड एॅकोनोमी सिक्युरिटी हा कायदा लागू केल्याने अमेरिकन शेअर बाजारातील यु. एस. स्टॉक एक्सेंज चे मूल्य 7.3 टक्क्याने, द डॉऊ जोन्स इंडस्ट्रीयल एव्हरेज चे मूल्य 7.73 टक्क्यांनी तर नाॅसडॅग चे मूल्य हे 7.33 टक्क्यांनी नाटकीय रित्या घसरले होते. याशिवाय 10 वर्ष मुदतीच्या अमरिकन स्ट्रझरी बिल चे मुल्य ही 0.67 टक्क्यांने घटले होते.

आशियाई वित्तीय बाजारावरही कोविड-19 चा नकारात्मक परिणाम दिसून आला. चिन, जपान सह भारतीय शेअर बाजारावर देखील कोरोना विषाणूचा परिणाम झाला आहे. युरोपातही कोविड-19 मुळे रोख्यांचे उत्पन्न फार मोठया प्रमानात घटले आहे. या परिस्थितीने 2011-12 या वर्षासारखी तणावाची पातळी गाठली आहे.

**औषधनिर्माण क्षेत्र:-**

जागतीक आरोग्य सेवेच्या गतीशिलतेत कोविड-19 च्या काळात खूप मोठया प्रमाणात बदल झाला आहे. जगातील प्रत्येक देश आता आपल्या देशातील नागरीकांची रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यावर भर देत आहे. यासाठी आरोग्य विषयक पायाभूत सुविंधात सतत वाढ करण्यात येत आहे. अमेरिकेने या काळात भारताकडून सक्रिय औषधांचे घटक 18 टक्के आयात केले तर चिनकडून 13 टक्के आयात केले. चिनचा अमरिकेला औषधी व वैद्यकीय उपकरण निर्यात करण्याचा हिस्सा हा 39.3 टक्के आहे. औषधनिर्माण क्षेत्रात असलेले चढ उतार व पुरवठयात येणा-या मर्यादा यामुळे या क्षेत्रातील महसूलात घट होण्याची संभाव्यता आहे. मात्र कोविड-19 वर लस व औषधाच्या निर्मितीसाठी काम करणा-या कंपण्यांसाठी ही एक संधी उपलब्द झाली आहे. अमेरिकेतील जॉन्सन अँड जॉन्सन, विर बायोटेकनोलॉजी, नोवावॅक्स इत्यादी कंपन्या कोविड-19 वर लस बनविण्यासाठी संशोधन करित आहेत.

**आदरातीथ्य क्षेत्र :-**

कोविड-19 मुळे या क्षेत्राला मोठया प्रमाणावर झळ बसली आहे. या क्षेत्रात दैनिक वेतनावर काम करणा-या कामगारांवर याचा फार मोठा परिणाम झाला आहे. मॅरिट इंटरनॅशनल या कंपनीत साधारणतः 174000 कर्मचारी कामाला आहेत त्यातील 1000 कर्मचारांना या कंपणीने बिनपगारी सक्तीच्या रजेवर पाठवीले आहे. हिंल्टन वर्डवाइल या कंपनीने आपल्या व्यवस्थापकांना कंपनीचा निधीचा जपूर वापर करण्याच्या सुचना दील्या आहेत.

हॉटेल व रेस्टारेंट हे बंद असल्याने या व्यवसायात गुंतलेल्या लोकांवर याचा मोठा परिणाम झाला आहे. अमेरिकेतील हॉटेल व्यवसायातील महसूल हा मार्च 2020 मध्ये 11.6 टक्क्यांनी घटला होता. तर चिनच्या हॉटेल व्यवसायाचा महसुल हा 89 टक्क्यांनी घटला होता. या काळात अमेरिकेतील ब-याचश्या हॉटेल कंपन्या ह्या 150 बिलिअन डॉलर मदतीच्या शोधात आहेत. एम. जि. एम. रिर्सोट इंटरनेशनल ने त्यांची लॉस वेगास ही मालमत्ता तात्पुरती बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. हॉटेल व्यवसायातून मिळणा-या जर्मनी या देश्याच्या महसुलात 1 मार्च 2020 पासून 36 टक्क्यांनी घट झाली आहे.

**पर्यटन व हवाई वाहतूक:-**

जगातील अनेक देशात टाळेबंदीची परिस्थिती असल्याने पर्यटन व हवाई वाहतूक क्षेत्राला याचा मोठा फटका बसला आहे. वर्ड ट्रॅवल्स अँड टूरिझम कॉन्सिल च्या अहवालानुसार कोविड-19 मुळे या क्षेत्रातील साधारणतः 5 कोटी रोजगार जातील. व्हिएतनामा या देशात 2019 च्या पहिल्या तिमाहीत 14 लाख 50 हजार चिनी पर्यटकांनी भेट दिली होती ती जानेवारी 2020 मध्ये 644000 ने घट झाली आहे. व्हिएतनामा या देशाला कोविड-19 मुळे 5 मिलिअन डॉलरचा फटका बसला आहे. हिच परिस्थिती आशियायी व अमेरिका खंडातील आहे.

कोविड-19 चा प्रसार थांबविण्यासाठी अनेक देशात टाळेबंदी लागू केली त्यामुळे आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुकीवर बंदने आली याचा फार मोठा तोटा हा विविध देशांतील विमानसेवा देणा-या कंपन्यांना बसला आहे. मलेशियाच्या विमानतळावर आंतरराष्ट्रीय प्रवासांच्या संख्येत 30 टक्क्यांनी घट झाली आहे. तर अमेरिकन एअसलाईन्स ने तोटयातून उठण्यासाठी सरकारकडे आर्थिक मदत मागितली आहे. याशिवाय यु. के. च्या हवाई वाहतूक कंपण्यांनी सुध्दा होणा-या तोटयातून सावरण्यासाठी 7.5 बिलिअन डॉलरची मागणी आपल्या सरकारकडे केली आहे. विमानसेवा बंद असल्याने या क्षेत्रात काम करणा-या असंख्य कामगारांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता आहे.

**गृहनिर्माण व बांधकाम क्षेत्र:-**

कोविड-19 च्या संकटामुळे वैयक्तीक व सामाजिक पातळीवर मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे आणि याचा परिणम जगातील गृहनिर्माण व बांधकाम क्षेत्रावर झाला आहे. या क्षेत्रात घेणारा व विकणारा या काळात एकत्र येऊ न शकल्याने या क्षेत्रात मंदी सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. ब-याच लोकांच्या उत्पन्नावर कोविड-19 चा परिणम झाल्याने या क्षेत्रातील योजनांचा पुर्णविचार केला जात आहे. जगातील अनेक देशात या

क्षेत्रात कामगारांना विनापगारी रजेवर पाठविले गेले आहे त्यामुळे कामगारांच्या उत्पन्नावर याचा परिणाम झाला आहे. या क्षेत्रावर कोविड-19 चा झालेला आणखी एक परिणाम म्हणजे या क्षेत्रावरिल विश्वास कमी होणे होय. यु. के. मधील ब-याचश्या बॅकांनी या क्षेत्रात कर्ज देण्यासाठी खबरदारी घेत आहेत.

**क्रिडा क्षेत्र:-**

2020 या वर्षी अनेक क्रिडा प्रकारांचे आयोजन केले गेले होते पण कोरोणाच्या संकटामुळे निर्माण झालेली अनिश्चितता यामुळे अनेक क्रिडा कार्यक्रम हे रद्द करावे लागले तर काही पुढे ढकलावे लागले आहेत. फुटबॉल युरो चषक-2020 हा 12 महिन्यांसाठी पुढे ढकलावा लागला आहे. टोक्यो ऑलोपिंक गेम हे 2021 पर्यत पुढे ढकलले गेले आहेत. ऑस्ट्रेलीया फार्मुला रेस ही स्पर्धा सुध्दा पुढची सुचना मिळेपर्यत पुढे ढकलली गेली आहे. याशिवाय 2020 च्या अखेरीस होणारा 20-20 क्रिकेट विश्वकप ही स्पर्धा सुध्दा पुढे ढकल्यात आली आहे. याशिवाय जगात होणारे अनेक क्रिडा प्रकार जसे गोल्फ, टेनिस, बाक्सेटबाल, रग्बी, सायकलींग, बॉक्सिंग इत्यादी स्पर्धा रद्द केल्या आहेत किंवा पुढे ढकलल्या गेल्या आहेत.

कोविड-19 चे जागतीक सामाजीक परिणाम:-

**बेकारीत वाढ:-**

जगातील बहुसंख्य असंगटीत कामगारांना कोविड-19 मुळे केलेल्या टाळेबंदीचा मोठा फटका बसला आहे. टाळेबंदीमूळे जागतीक उत्पादन प्रक्रियाच पुर्णपणे ठप्प होती यामुळे तेथे कार्यरत असलेला कामगार वर्गावर बेकार होण्याची वेळ आली आहे. आंतरराष्ट्ीय श्रम संघटनेच्या मते कोविड-19 च्या प्रभावामुळे जगातील 19 कोटी 50 लाख लोकांचे रोजगार जाण्याची शक्यता आहे.

**दारिद्रयात वाढ:-**

कोरोना विषाणुमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत खूप मोठया प्रमानावर घट होत आहे. जगातिल ब-याचश्या देशांची उत्पादन व उत्पादन साखळी यामुळे प्रभावित झाली आहे. याचा परिणाम प्रत्येक देशांतील कामगार वर्गाच्या उत्पन्नावर होत आहे. रोजगार गमावल्यामुळे असंख्य कामगारांवर बेकार झाले आहेत त्यामुळे जागतिक दारिद्रयात वाढ होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार कोविड-19 मुळे जगातील सुमारे 40 ते 60 मिलिअन लोक हे दारिद्रयात जाण्याची संभाव्यता आहे.

**महिलावरिल परिणाम:-**

संपुर्ण जगभरातील 104 देशात सरासरी 70 टक्के महिला ह्या आरोग्य क्षेत्रात व सामाजीक क्षेत्रात काम करत आहेत. आधीच महिला ह्या पुरूषांपेक्षा तिन पट अधिक काम करतात. कोविड-10 च्या संक्रमणाने महिल्यांच्या कामात आणखी वाढ झाली आहे. या काळात मुले घरीच असल्यामुळे त्यांची काळजी घेणे याशिवाय घरातील वयोवृध्द व्यक्तीची काळजी घेणे इत्यादी कामे महीलांना करावी लागत आहेत.

**घरघुती हिंसाचारात वाढ:-**

कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सामाजीक अंतर राखणे किंवा संचारबंदी च्या उपायामुळे जगात घरघुती हिंसाचाराच्या घटनेत वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यात भावनिक, शारीरीक व लैगिंक अत्याचार समाविष्ट आहेत. जगातील अनेक देशांनी या अत्याचारांची तक्रार नोदंविण्यासाठी हेल्प लाईन सुरू केली त्यात येणा-या फोन का ॅलची संख्या खुप वाढल्याचे दिसून आले. यु. के. सरकारनी तयार केलेल्या हेल्पलाईनवर येणा-या फोन कॉलची संख्या ही 25 टक्क्याने वाढल्याचे जाहीर केली.

**सामाजीक संरक्षणाची कमतरता:-**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार जगातील 55 टक्के लोकसंख्या हि कोणत्याही सामाजीक विमा किंवा सामाजीक मदतीने संरक्षीत नाही. याशिवाय जागतीक पातळीवर केवळ 20 टक्के बेरोजगारांना लोकांना बेरोजगारीच्या संकटामूळे संरक्षित केले जाते आणि काही क्षेत्रातील ही व्याप्ती तर खूपच कमी आहे. त्यामुळे या वर्गातील लोकांना कोविड-19 मुळे निर्माण झालेल्या परीस्तितीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

**झोपडपट्टीत राहणाÚया लोकांच्या असुरक्षतेत वाढ:-**

जगभरात कोविड-19 चे 90 टक्क्याहून अधिक रूग्ण हे शहरी भागात निघालेले आहेत आणि जगभरातील अनेक देशातील शहरी भागातील झोपडपट्टीत 1 अब्जाहून अधिक लोकसंख्या वास्तव्य करत आहे. अशा लोकवस्तीत विषाणूच्या संक्रमणाचा धोका होण्याचा अधिक असते त्यामुळे या काळात झोपटपट्टीत राहणा-या लोकांच्या असूसक्षेतेत वाढ झाली आहे.

**निष्कर्ष:-**

चिनच्या वुहान या शहरातून कोरोनाची सुरूवात झाली आणि आता संपूर्ण जगाला या विषाणूने ग्रासले आहे. जगात बलाढय समजल्या जाणा-या अर्थव्यवस्था देखिल कोविड-19 च्या प्रभावामुळे हतबल झाल्याचे दिसून येत आहेत. संपुर्ण जग आत ऐका नवीन मंदीकडे वाटचाल करतांना दिसत आहे. या विषाणूच्या प्रकोपामुळे जागतीक अर्थव्यवस्थेत मोठया प्रमानात घट होण्याची संभाव्यता आहे.

कोविड-19 च्या प्रभावामुळे जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यातून बाहेर येण्याचे संपूर्ण जगासमोर मोठे आव्हान आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक देशातील सरकारणे एक सक्षम अशी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. सक्षम व दिर्घकालीन उपाय जगातील प्रत्येक देशांनी केले तर जागतीक अर्थव्यवस्थेचे चक्र हे पुन्हा सुरू होण्यास मदत होईल व कोविड-19 या विषाणूमुळे उद्धवलेली आर्थिक व सामाजीक परिस्थितीत सुधारणा करण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ:-**

संयुक्त राष्ट्रसंघाचा अहवाल - जून, 2020

KPMG चा अहवाल - एप्रिल, 2020

मधु कांबडे - लढाईत ढिलाई नको -संपादकीय, दै.लोकसत्ता- 18 मार्च, 2020

डॉ. रूपा रेगे नित्सुरे - आणि ठरू अपराधी -संपादकीय, दै. लोकसत्ता- 21 मे, 2020

www.imf.org

https://data.worldbank.org>indicator


www.wto.org

www.financialexpress.com

www.economicstime.com

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

Tables and Figure




( स्त्रोत:- आतरराष्ट्री